साप्ताहिक

# सहकारनामा

Email :sahkarnamanews@gmail.com

✻ संपादक : अब्बास शेख मो.९०९६७७७७५०

वर्ष २ रे ●अंक ११ वा● रजि.नं.एमएएचएमएआर ४९९८३/दि.१४/०२/२०१९ ● डिक्ले.नं.एसडीएम/एसआर/०२/२०२१ दि.१०/०६/२०२१ ● सोमवार दि.१४/०६/२०२१ ● पाने:४ ● मूल्य:२

Valume-2th● Issue-11th● Regd.No. MAHMAR49983/2019 Dt.14/02/2019 ● Declaration No. SDM/SR/02/2021 Dt.10/06/2021 ● Monday Dt.14/06/2021 ● Page:4 ● Rs.2 /-

## आमदार राहुल कुल यांच्या हस्ते केडगाव येथे रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**दौंड:** केडगाव (ता.दौंड) येथे केडगाव ग्रामपंचायत च्या वतीने लोकांसाठी खरेदी करण्यात आलेली म्बुलन्सचा लोकार्पण सोहळा तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्या हस्ते पार पडला.आमदार राहुल कुल यांनी केडगाव येथे कोविड केअर सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी केडगाव हे मोठे गाव आहे, त्यामुळे तुम्ही एक ॲम्बुलन्स खरेदी करावी अशी सूचना त्यावेळी केली होती. त्या सूचनेनुसार केडगाव ग्रामपंचायत ने १४ व्या वित्त आयोग फंडातून ही रुग्णवाहिका खरेदी करत ही म्बुलन्स केडगाव आरोग्य केंद्राकडे आज सुपूर्त केली. म्बुलन्स सर्वांसाठी फ्रि



असेल यासाठी एक टोल फ्री नंबर दिला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी आमदार राहुल कुल यांसह सरपंच अजित शेलार पाटील, उपसरपंच अशोक हंडाळ, भातीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष माऊली ताकवणे, विकास शेलार, आप्पासो हंडाळ, शिवाजी सूळ, प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी, कर्मचारी, तसेच किरण देशमुख, शहाजी गायकवाड, केडगाव ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार ग्राप सदस्य नितीन जगताप यांनी मानले.

## दौंड तालुक्यातील गुऱ्हाळांवर जाळण्यासाठी आणले जातेय कोरोना काळात वापरलेले पीपीई किट आणि मास्क! तहसीलदारांचा कडक इशारा तर वैद्यकीय अधिक्षकांची चेतावणी



**दौंड:** दौंड तालुक्यातील गुऱ्हाळांवर कोरोना काळात वापरण्यात आलेले पीपीई किट आणि मास्कचा सर्रास वापर करण्यात आल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.दौंड तालुक्यातील खोपोडी, दापोडी यांसह तालुक्यातील विविध ठिकाणी असणाऱ्या गुऱ्हाळांवर हा कोरोना कचरा' वापरण्यात येत असल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेने त्वरित अशा प्रकारच्या कचऱ्यावर आणि तो कचरा आणणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिक करीत आहेत.कोरोना काळात वापरलेले पीपीई किट, हॅन्डग्लोज आणि मास्क यांची वैद्यकीय निरीक्षणाखाली त्याची विल्हेवाट लावली जाते मात्र येथील प्रकार पाहिल्यानंतर या गुऱ्हाळांवर गाड्याच्या गाड्या भरून येणारे हे पीपीई किट, ग्लोज आणि मास्क येतात कुठून आणि याबाबत सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

**ज्या गुऱ्हाळांवर कोरोना काळात वापरलेले अशा प्रकारचे पीपीई किट, हॅन्ड ग्लोज, मास्क सापडतील त्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे त्यामुळे आरोग्यास घातक ठरणाऱ्या अशा प्रकारच्या वस्तू कुणीही जाळण्यासाठी गुऱ्हाळांवर आणू नये.**

**श्री.संजय पाटील- तहसीलदार दौंड**

**पीपीई किट, हॅन्ड ग्लोज, मास्क हे बायो मेडिकल वेस्ट आहे, आणि अशा पद्धतीच्या बायो मेडिकल वेस्ट ची विल्हेवाट सायंटिफिक पद्धतीनेच लावावी लागते त्यामुळे ते अशा कोणत्याही इतर अन्य ठिकाणी जाळता येत नाही. कोरोना काळात वापरण्यात आलेल्या बायो वेस्ट च्या या वस्तूंमुळे इन्फेक्शनचा धोका होऊ शकतो त्यामुळे असल्या वस्तू कुणीही हाताळू नये आणि जाळण्यासाठी आणू नये.**

**डॉ.संग्राम डांगे-अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय, दौंड**

**दौंड तालुक्यातील अनेक गुऱ्हाळांवर सध्या कोरोना काळात वापरण्यात येत असलेले पीपीई किट, हॅन्ड ग्लोज आणि मास्क आढळून आले आहेत, मी स्वतः काही गुऱ्हाळांवर जाऊन याची शहानिशा केली असता मला धक्काच बसला, कारण या ठिकाणी काम करणारे कामगार हे हाताने या वस्तू उचलून गुऱ्हाळांच्या चुलांगणामध्ये टाकताना आढळून आले. त्यामुळे अशा गुऱ्हाळांवर आता कडक कारवाई होणे गरजेचे आहे.**

**नानासाहेब टेंगले**

**अध्यक्ष (पुणे जिल्हा) - अखिल भारतीय ओबीसी सेवा संघ**

## राष्ट्रवादी काँग्रेसचा २२ वा वर्धापनदिन मुंबईत दिमाखात साजरा



**मुंबई:** आज दि. १० जून २०२१ रोजी मुंबई च्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश कार्यालयात पक्षाच्या २२ व्या वर्धापन दिनाच्या निमित्तानं ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी उपस्थित पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या विशेष दिनाच्या शुभेच्छा देत आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्ता पक्षाचा कणा आहे. आदरणीय शरद पवार साहेबांच्या ध्येय धोरणावर विश्वास ठेवून लाखो कार्यकर्तेगावागावात जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम वाढवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ह्या कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर आणि कष्टावर आज पक्ष दिमाखात उभा आहे असे सांगत त्यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. आणि महाराष्ट्राच्या जनतेचं प्रेम सातत्यानं लाभलं असा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एकमेव पक्ष आहे. २०१४ च्या निवडणुकीचा अपवाद वगळता जनतेनं मोठ्या विश्वासानं आघाडीच्या माध्यमातून राज्यात सत्तेत आणून जबाबदारी सांभाळण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्याबद्दल तमाम जनतेचे देखील त्यांनी आभार मानले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं जनतेच्या प्रेमाच्या बळावर आपली जागा निर्माण केली. जात-पात, धर्म, पंथ, प्रांत यात कुठलाही भेदभाव न करता सर्व समाज घटकाला सोबत घेऊन पक्ष पुढे आपली वाटचाल करीत आहे. सर्व समाज घटकांना संधी उपलब्ध करून देत ही वाटचाल पुढे सुरूच राहणार आहे. हृदयात महाराष्ट्र आणि नजरेसमोर राष्ट्र अशा व्यापक विचाराच्या दृष्टिकोनातुन आदरणीय पवार साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. २२ वर्षांत त्यांनी शेती, विज्ञान, उद्योग, शिक्षण, सहकार, समाजसेवा, राजकारण अशा अनेक क्षेत्रांत काम करणारे नेते-कार्यकर्तेनिर्माण केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्रातल्या मातीशी आणि इथल्या माणसाशी नातं सांगणारा पक्ष आहे. राज्यातल्या जनतेशी नाळ जुळलेला पक्ष आहे. महाराष्ट्रासारखीच पक्षाची स्थापना सुद्धा संघर्षातुन झाली आणि संघर्ष करतच पक्ष मोठा झाला आहे. कोरोना संकट काळात बेड, औषधं, अन्नधान्य यांसारख्या अत्यावश्यक गरजा वेळोवेळी पुरवण्याचा प्रयत्न पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला. कोरोना असेपर्यंत आपल्याला असंच काम करत रहायचं आहे. थकून चालणार नाही. स्वतःची काळजी घेऊन कार्य अविरत सुरूच राहिलं पाहिजे, असं वर्धापन दिनानिमित्तानं त्यांनी आवाहन केले. पक्षानं आजपर्यंत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महिलांना आरक्षण, वडिलोपार्जित संपत्तीत मुलींना वाटा, महिलांसाठी देशातलं पहिलं महिला धोरण आणि महाराष्ट्रातील फळबाग योजना असे अनेक निर्णय पक्षाच्या माध्यमातून राज्यात घेण्यात आले आहेत. साहेबांच्या दूरदृष्टीनं पुरोगामी महाराष्ट्राच्या प्रगतीची वाटचाल अधिक गतिमान झाली आहे, हे कुणी नाकारू शकत नाही. महाराष्ट्रासह देशाच्या नवनिर्माणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपला वाटा उचलेल, यात कोणतीही शंका नाही. याच दृष्टिकोनातून पक्षाची पुढची वाटचाल राहील, याची खात्री आहे असा विश्वास त्यांनी शेवटी आपल्या भाषणात व्यक्त केला.

## अघोषित भारनियमन न करता दौंडकरांना पूर्णवेळ वीज पुरवठा करा, दौंड काँग्रेस कमिटीची मागणी

दौंड : दौंड शहरात सध्या विजेचे अघोषित भारनियमन होत आहे, हा प्रकार बंद करून महावितरण कंपनीने दौंड करांना पूर्णवेळ वीज पुरवठा पुरवावा अशी मागणी दौंड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे, तसेच विज बिल थकबाकी दारांचे वीज जोड न तोडता त्यांना बिलासाठी हप्ते बांधून द्यावेत अन्यथा महावितरण विरोधात आंदोलनाचा इशारा काँग्रेस कमिटीने दिला आहे. पक्षाच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन महावितरण कंपनीला देण्यात आले.कामाच्या नावाखाली दररोज शहरातील विविध भागात भारनियमन केले



जात आहे. शहरातील कोरोना चा प्रादुर्भाव कमी होत असल्याने आता कोठेतरी शहरातील बाजारपेठा, घरगुती पीठ गिरण्या व इतर व्यवसाय सुरू झाले आहेत, त्यामुळे भारनियमन न करता त्यांना पूर्णवेळ वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा. तसेच लॉक डाऊन मुळे व्यापारी, खाजगी नोकरदार यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे त्यामुळे वीज बिलांची वसुली करताना कोणाचेही विज जोड न तोडता बिलाचे पैसे भरण्यासाठी त्यांना हप्ते बांधून द्यावेत. महावितरण कार्यालयामध्ये एक सक्षम तक्रार निवारण अधिकाऱ्याची नेमणूक करावी अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. निवेदन देतेवेळी पक्षाचे पदाधिकारी हरेश ओझा, महेश जगदाळे,तन्मय पवार, विठ्ठल शिपलकर, अतुल जगदाळे, रज्जाक शेख, अतिश जगताप, सुनील मधुरकर उपस्थित होते.

# संपादकिय....
## आता तरी जागे' व्हा

राज्यात कोरोनाची दुसरी लाट आली आणि तिने मोठ्या प्रमाणावर थैमान घालण्यास सुरुवात केली. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कोरोनाचे रुग्ण वाढले, हि चिंतेची बाब होतीच मात्र मागील लाटेपेक्षा यावेळीच्या दुसऱ्या लाटेत अनेक घर-संसार उध्वस्त झाले. त्यामध्ये त्यामुळे कोरोनावर जो पर्यंत चांगला प्रभावी उपाय सापडत नाही तोपर्यंत स्वत:ची आणि कुटुंबाची खबरदारी' घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे.दुसऱ्या लाटेत पुणे जिल्ह्यामध्ये ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली मात्र लोकांनी नियम पायदळी तुडवून बिनधास्त फिरणे आणि कोणतीही खबरदारी न घेणे हे मागील लाटेप्रमाणे चालूच राहिले यामुळे संशयित रुग्णांमध्ये वाढ होत जाऊन अनेकांना आपल्या प्राणास मुकावे लागले.आता लॉकडाउनची वाटचाल अनलॉककडे होत असताना नागरिकांनी सर्व बंधने झुगारून रस्त्यावर पहिल्यासारखे घोळक्याने फिरणे पुन्हा महागात पडू शकते हे लक्षात घेणे गरजेचे आहे. तोंडाला मास्क नाही, प्रत्येक ठिकाणी मोठी गर्दी, वापरातून दुर्मिळ झालेले सॅनिटायजर आणि एकदुसऱ्यासोबत सुरू झालेले हस्तांदोलन हे पुन्हा कोरोना सक्रिय होण्यासाठी पुरेसे ठरत आहे. कोरोना अजून गेलेला नाही असे प्रशासकीय यंत्रणा ओरडून सांगत असतात मात्र लोक त्याला गंभीरतेने घेत नसल्याचे अनेक प्रकारणांवरून दिसून आले आहे. त्यामुळे कोरोनापासून स्वत:ला दूर ठेवायचे असेल तर स्वत:च स्वत:ला काही बंधने घालून घेणे गरजेचे आहे. अन्यथा कोरोनाचा विषाणू पुन्हा व्हायरल होण्यास वेळ लागणार नाही हे सर्वांना आता चांगलेच समजले आहे. सध्या ग्रामिण भागात कोरोनाचे प्रमाण कमी होताना दिसत असले तरी अजूनही पॉझिटिव्ह रुग्ण सापडणे बंद झालेले नाही. सरकारी आकडेवारी कमी होत असताना खाजगी हॉस्पिटलमध्ये मात्र अजूनही कोरोना रुग्णांचा भरणा कमी झालेला नाहीये. त्यामुळे कोरोना आता हद्दपार झालाय आणि आता बिनधास्त फिरा असे मानणे चुकीचे ठरणार आहे. कारण कोरोना का वाढला किंवा का वाढतोय या प्रश्नाचे उत्तर शोधले तर आपल्या स्वत:च्या चुका निश्चित समोर येतील यात शंका नाही. यासाठी आता खबरदारी हा सर्वात चांगला उपाय असून हात स्वच्छ साबणाने धुणे, मास्क घालणे, सॅनिटायजरचा वापर करणे, गर्दी टाळणे (स्वत: गर्दीपासून दूर राहणे) हे उपाय केल्यास नक्कीच कोरोना आटोक्यात येऊ शकेल, त्यामुळे आता खबरदारी हाच चांगला उपाय मानून त्या दृष्टीने सुरक्षिततेची पावले उचलणे कधीही फायद्याचे ठरेल यात शंका नाही.

## दौंड तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी संदीप होले यांची निवड

**दौंड :** दि. १० जून रोजी सहायक निबंधक कार्यालयात पार पडलेल्या निवड प्रक्रियेत दौंड तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार संदीप विश्वनाथ होले यांची ९ विरुद्ध ८ मताने निवड झाली. होले यांच्या विरुद्ध बाळासाहेब काटे यांनी उमेदवारी अर्ज भरला होता, मात्र काटे यांचा केवळ एक मताने पराभव झाला.आप्पासाहेब कुल यांचे या संस्थेवर १९९५ पासून वर्चस्व आहे मात्र गेल्या वर्षभरात कुल यांचे कार्यकर्तेविकास शेलार यांनी विरोधी समितीच्या सहाय्याने सत्ता हस्तगत केली होती मात्र ती कायम राखण्यात त्यांना अपयश आले. संदीप होले हे संघाचे निष्ठावान कार्यकर्तेम्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत, सामान्य कार्यकर्त्याला न्याय मिळाल्याने सर्वच शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे. होले यांच्या निवडीप्रसंगी शांताराम काका जगताप, शरद धुमाळ, रामभाऊ दोरगे, राजाभाऊ लडकत, नंदुभाऊ



शिंदे उपस्थित होते. १९९५ सालापासून प्राथमिक शिक्षक संघाचे व आप्पासाहेब कुल यांचे वर्चस्व या संस्थेवर राहिले आहे.

## राष्ट्रवादी'च्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाध्यक्षा वैशालीताई नागवडेंकडून सहा कोविड सेंटरला मोफत अन्नदान

**दौंड:** राष्ट्रवादी काँग्रेसच्या २२ व्या वर्धापनदिनानिमित्त पुणे जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा वैशालिताई नागवडे यांच्यावतीने यवत, बोरीभडक, देऊळगाव गाडा, केडगाव, वरवंड, पाटस या ठिकाणी असणाऱ्या तब्बल ६ कोविड सेंटरला मोफत जेवण देण्यात आले आहे. तर कोविड चे नियम नागरिकांनी पाळून त्यांचे कोरोनापासून संरक्षण व्हावे यासाठी मास्कचेही वाटप करण्यात आले आहे.आज राष्ट्रवादी काँग्रेसचा २२ वा वर्धापनदिन असून १९९९ साली सोनिया गांधी या काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्यानंतर काँग्रेसचे जेष्ठ नेते शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची १० जून रोजी स्थापना केली. आज त्यास २२ वर्षेपूर्ण झाली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचा राज्यात आणि देशातील राजकारणात सक्रिय सहभाग असतो आणि शरद पवार या नावाचा मोठी जरबही आहे. शरद पवार यांचे काँग्रेसमध्ये बिनसल्यानंतर काँग्रेस पक्षानं त्यांच्यावर निलंबनाची



कारवाई केली आणि शरद पवार यांनी ही बिहारमधील तारिक अन्वर आणि मेघालयातील पी. एम. संगमा यांच्या सोबत १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. आज या पक्षाला २२ वर्षेपूर्ण झाली असून या २२ वर्षांत केवळ ५ वर्ष हा पक्ष सत्तेबाहेर राहिला आहे हे विशेष.

## दूध दरासाठी चक्क दुधाने अंघोळ', महाविकास आघाडी सरकारचा रयत क्रांतिकडून निषेध



दौंड : रयत क्रांती संघटनेचे संस्थापक आमदार सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वाखाली आज संघटनेसहित दूध उत्पादकांचा राज्यव्यापी आंदोलनाचा दिवस होता. या आंदोलनात रयत क्रांती संघटनेचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे, जिल्हा सरचिटणीस सयाजी मोरे, शेतकरी संतोष गायकवाड माजी ग्रामपंचायत सदस्य वसंत धोंडीबा गायकवाड, नंदकुमार रामभाऊ गवळी,सोमनाथ बाळासाहेब कोलते, पांडुरंग अण्णा गायकवाड, रामभाऊ गायकवाड, विठ्ठल बापुराव गवळी. तात्यासो गावडे, तुकाराम गायकवाड, अण्णा मारुती गायकवाड, स्वप्नील शिवाजी गवळी, गौरव दिलीप गवळी, दत्तात्रय गावडे, हनुमंत गायकवाड, साहेबराव गावडे, प्रवीण गवळी, महादेव गायकवाड, सचिन कोलते,दादासो गवळी, अनिल गवळी इत्यादी दूध उत्पादकांनी आंदोलनात सहभाग घेतला. दूध उत्पादक शेतकरी संतोष गायकवाड यांच्या गुरांच्या गोठ्यामध्ये महाविकास आघाडी सरकारचा प्रतीकात्मक पुतळा तयार करून त्याच्यासमोर राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे यांनी दुधाने अंघोळ करून राज्य सरकारचा निषेध व्यक्त केला.राज्यामध्ये रोज दोन कोटी लिटर गाईचे व म्हशीचे दूध शेतकरी उत्पादन करतो. परंतु सरकार शेतकऱ्यांना योग्य बाजार भाव देत नाही. पाण्यापेक्षाही दूध स्वस्त झाले व पाणी महाग झाले अशी अवस्था दूध उत्पादक शेतकऱ्यांची तयार झाली आहे. एका बाजूला गुरांना लागणारे भुसा पेंड या खाद्याचे दर गगनाला भिडले आहेत दुसऱ्या बाजूला कोरोना अतिवृष्टी महापूर व बाजार भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. अशा अवस्थेत शासनाने शेतकऱ्यांना दिलासा म्हणून गाईच्या दुधाला ३० रुपये व म्हशीच्या दुधाला ६० रुपये प्रति लिटर दूध दर द्यावा अशी प्रमुख मागणी या ठिकाणी करण्यात आली.दुधापेक्षा पाणी महाग महाविकास आघाडी सरकारला येऊ द्या जाग.. रयत क्रांती संघटनेचा विजय असो शेतकरी एकजुटीचा विजय असो कोण म्हणतो देत नाही घेतल्याशिवाय राहात नाही. दुधाला हमीभाव मिळालाच पाहिजे. अशा प्रकारच्या घोषणा या वेळी देण्यात आल्या.या आंदोलनासाठी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खाजगी सेवेतील कर्मचाऱ्यांना रेल्वे प्रवासाची अनुमति मिळावी, दौंड -पुणे- दौंड प्रवासी संघाची मागणी

**दौंड:** पुणे,दौंड शहरातील कोरोना रुग्णांची संख्या खूपच कमी झाल्याने परिस्थिती आटोक्यात येण्यास सुरुवात झाली आहे त्यामुळे खाजगी सेवेतील कर्मचाऱ्यांना आता दौंड -पुणे- लोणावळा रेल्वे प्रवासा करिता अनुमति मिळावी अशी मागणी प्रवासी संघाचे अध्यक्ष प्रेमसुख कटारिया यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दौंड - पुणे प्रवासी संघाचे पदाधिकारी गणेश शिंदे व आयुब तांबोळी यांनी संघाच्या मागणीचे निवेदन तहसीलदारांकडे दिले आहे. मार्च २०२० पासून



सर्वत्रच कोरोना महामारी चा प्रादुर्भाव वाढत होता, कोरोना रुग्णांची संख्या सर्वत्रच वाढू लागल्याने मार्च २०२० पासून रेल्वे प्रशासनाने खाजगी सेवेतील कर्मचाऱ्यांना रेल्वे प्रवासास बंदी केली, ज्यामुळे मागील दीड वर्षापासून अनेक खाजगी क्षेत्रातील कर्मचारी कामावर जाऊ शकले नाहीत परिणामी काहींना नोकरीस मुकावे लागले आहे.

सध्या परिस्थिती आटोक्यात येत असल्याने या सर्वांचा सहानुभूतिपूर्वक विचार करून खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना रेल्वेने प्रवास करण्यास अनुमति देण्यात यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने पारगावमध्ये वृक्षारोपण

**दौंड:** जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एम. सी.एल.सीएनजी गॅस धन अशोका व पारगाव ग्रामस्थ यांच्या वतीने पारगाव तलाठी कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दौंड तालुक्याचे माजी आमदार रमेश थोरात, सयाजी ताकवणे, मा.उपसभापती पोपटराव ताकवणे, नानासाहेब जेधे, वेताळ तलाठी हे उपस्थित होते.दौंड तालुक्यातील चार गावांमध्ये हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला असून एम सी एल कंपनी व धना अशोकाचे गिरमकर सर यांच्या



मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सीएनजी गॅसबाबत सर्व माहिती उपस्थितांना देण्यात आली. तालुक्यामध्ये या कंपनीचे पावणे सहा हजार सभासद झाले असून अन्य शेतकऱ्यांनीही सभासद व्हावे असे आवाहन संचालकांकडून करण्यात आले असून या उपक्रमास रमेश थोरात यांनी सर्वतोपरीने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.या कार्यक्रमास सुभाष ताल्या बोत्रे, संतोष ताकवणे, नामदेव काळे, संभाजी ताकवणे, चांदभाई मन्यार, दत्तू ताकवणे, डॉक्टर माऊली बोत्रे, विश्वास ताकवणे, स्वप्निल खांदवे, विजय ताकवणे, दशरथ बोत्रे, रामकृष्ण ताकवणे, सुरेश ताकवणे, पारगाव ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार अल्पसंख्यांक सेलचे उपाध्यक्ष चांदभाई

# उपमुख्यमंत्री अजित पवारांची' आमदार राहुल कुल' यांच्यावर स्तुती सुमने'





**पुणे:** पुणे जिल्ह्यात दोन दादा' आपल्या कार्याने कायमच प्रकाशझोतात राहताना दिसतात.दोन्ही दादांचा कामाचा वेग हा प्रचंड आहे. एक दादा राज्य पातळीवर आपल्या कामांचा ठसा उमटवत असतात तर दुसरे दादा जिल्हा पातळीवर आपल्या कामाचा ठसा उमटविण्यात आणि लोकांचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी ठरले आहेत. आता तुम्ही समजलेच असाल की आम्ही कुणाबद्दल बोलतोय, हे दोन्ही दादा' म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आमदार राहुल कुल हे आहेत.कोरोना व्हायरसने आपले उग्ररूप धारण केल्यानंतर दौंडचे आमदार राहुल कुल हे सातत्याने तालुक्यातील प्रत्येक बाबीवर लक्ष ठेऊन आहेत. त्यांच्या माध्यमातून तालुक्यात अनेक ठिकाणी शेकडो बेड ची कोविड सेंटर्स सुरू करण्यात आली आहेत.ते आपल्या सहकाऱ्यांसह दररोज या कोविड सेंटर्सला भेट देऊन रुग्णांची विचारपूस करतात, कुणाला कोणत्या गोष्टीची कमतरता तर नाही ना याची डॉक्टर आणि रुग्णांकडून आवर्जून माहिती घेतात. कोविड सेंटर मध्ये वाढ आणि योग्य नियोजन हे सर्व उपक्रम राबविल्याने दौंड तालुक्यात कोरोना महामारी आता आटोक्यात येताना दिसत आहे. या कोविड सेंटर्समध्ये नुसते गरीबच नाही तर अनेक प्रतिष्ठित व्यक्तीही आवर्जून इलाजासाठी भरती होतात हे यामागील यशाचे खरे गमक आहे. आमदार राहुल कुल यांच्या या कार्याची दखल घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही आमदार राहुल कुल यांच्या कार्याची स्तुती केली असून त्यांनी आ.कुल यांच्या या प्रामाणिक कार्याबद्दल आणि जनतेच्या आस्थेबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.राज्याचे विरोधीपक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही आमदार राहुल कुल यांच्या कार्याबद्दल गौरोवोद्गार काढताना राहुल कुल हे एक कष्टाळू आणि प्रामाणिकपणे जनतेची सेवा करणारे आणि ज्यांना काम समजते आणि ते कसे करावे हे ज्यांना माहीत असते असे आमदार आहेत आणि त्यांच्या कार्याचे कौतुक करावे तितके थोडेच आहे असे म्हटले आहे.तालुक्यात कोरोना महामारी झपाट्याने वाढत असताना तिला पायबंद घालून गोरगरीब आणि सर्वच स्तरातील लोकांसाठी संपूर्ण तालुक्यात अनेक कोविड सेंटर उभारून आणि आपल्या आणि आपल्या सहकाऱ्यांच्या मार्फत दिवसरात्र प्रत्येक बाबीवर लक्ष ठेऊन जी मदत आमदार राहुल कुल यांनी जनतेला केली आहे ती कधीच विसरता येणार नाही हे मात्र कुणीच नाकारू शकत नाही.

# भाजप किसान मोर्चा प्रदेशाध्यक्षपदी वासुदेव काळे



**मुंबई :** भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा च्या प्रदेश अध्यक्षपदी दौंड चे वासुदेव(नाना) काळे यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी वासुदेव काळे यांची भाजप किसान मोर्चा प्रदेश अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.
यापुर्वी मा.कृषीमंत्री डॉ.अनिल बोंडे यांनी हि जबाबदारी संभाळलेली होती. प्रदिर्घ अनुभव धडाडीचे नेतृत्व, महाविद्यालय शिक्षणानंतर राजकारणात आलेले वासुदेव काळे सुरूवातीपासुनच भाजपात कार्यरत असुन कृतीशिल धडाडीचे नेतृत्व म्हणुन त्यांची ओळख आहे. दोनवेळा पुणे जिल्हा परिषद सदस्य राहिलेल्या काळेंनी सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून ही काम केलेले आहे तसेच दौंड विधानसभेची दोन वेळा निवडणुक लढविली आहे.
बारामती लोकसभा निवडणुकीचे सलग ४ निवडणुकांचे प्रमुख म्हणून जबाबदारी प्रभावीपणे पार पाडणारे काळे हे पक्षात पुणे जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष, भाजपा पुणे जिल्हा अध्यक्ष, महा.प्रदेश युवा मोर्चा उपाध्यक्ष, महा.किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष, प्रदेश किसान मोर्चा सरचिटणीस तसेच गेले अनेक वर्ष प्रदेश पातळीवरील संघटनात्मक विविध जबाबदाऱ्या प्रमाणिक पणे निष्ठेने पार पाडलेल्या आहे.
श्री.काळे हे गेली आठ वर्षापासुन जिल्हास्तरीय कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातुन केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यापर्यंत पोहचवित असतानाच मोफत माती परीक्षण, नवीन पिक पध्दती, नवनविन विकसीत कृषी तंत्रज्ञान, शेती पुरक व्यवसाय, पशु संवर्धन अश्या अनेक विषायांवर अत्यंत प्रभावीपणे काम करत आहे. मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आठ वर्षात पुर्वी सुरू केलेला कृषीक्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्याला कृषी मित्र म्हणून पुरस्कार किसान मोर्चाच्या वतीने प्रदान करून सन्मानित करण्यात येत आहे.
पश्चिम महाराष्ट्र प्रकल्प व धरणग्रस्त संघटनेच्या माध्यमातुन उजनी धरणग्रस्तांसह विविध प्रकल्पांमधील बाधित व अन्यायग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने आक्रमक पध्दतीने काम करणारे काळे विरोधी पक्षात काम करताना शेतकऱ्यांचे प्रश्न तडीस लावण्यासाठी अतिशय आक्रमक आंदोलने, उपोषणे करणारा कार्यकर्ता म्हणून ओळख आसणारे काळे यांची भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश अध्यक्षपदी निवड केल्याने सर्व स्तरातुन आनंद व्यक्त होत आहे. दौंडचे आमदार राहुल कुल यांनीही त्यांना या निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

# मलठण येथील गावठी दारूभट्टी दौंड पोलिसांकडून उध्वस्त ! ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त, तिघांविरोधात गुन्हा दाखल

**दौंड:** कोरोना काळात सर्वत्र लॉक डाऊन असतानाही गावठी दारू बनविणाऱ्यांना दौंड पोलिसांनी दणका दिला आहे. तालुक्यातील मलठण येथील गावठी दारू च्या अड्ड्यावर दौंड पोलिसांनी धाड टाकीत दारू भट्टी उध्वस्त करीत ८६ हजाराचा मुद्देमाल जप्त करून तिघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे. निलेश जगन्नाथ लोंढे (रा. ज्योतिबा नगर,दौंड) रमेश भिवाजी शेंडगे, गणेश मारुती शेंडगे (दोघे रा. मलठण)अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. मलठण गावच्या हद्दीतील चव्हाण वस्ती परिसरात गावठी दारूची भट्टी लावली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी त्या दारू भट्टी अड्ड्यावर धाड टाकली, पोलिसांची चाहूल लागताच आरोपी फरार झाले. पोलिसांनी या ठिकाणाहून गावठी दारू (हातभट्टी) बनविण्यासाठी लागणारे मोठ्या प्रमाणावरील कच्चे रसायन, पत्र्याची टाकी, दोन इलेक्ट्रिक मोटार असा ८६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी या ठिकाणी भट्टी लावून गावठी दारू तयार करीत होते पोलिसांची धाड पडताच त्यांनी तेथून पळ काढला, फरार आरोपी विरोधात पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास सहा. पो. निरीक्षक शिंदे करीत आहेत.

# तुंबलेल्या गटारीचे पाणी थेट घरांत! दौंड शहरातील नागरिक संतप्त, नगरपालिका दुर्लक्ष करत असल्याचा आरोप

**दौंड:** दौंड शहरातील शिरापूर रोड परिसरातील सिंधी मंगल कार्यालया शेजारील काही घरांमध्ये तुंबलेल्या गटारीचे पाणी जात असून येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. येथील नागरिकांनी नगर पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत वारंवार तक्रारी केल्या आहेत परंतु नगरपालिका याकडे दुर्लक्ष करीत असल्याने आज दि ७ जून रोजी येथील पतीत पावन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी निर्मला राशिनकर यांची भेट घेत सदर तक्रारीचे निवेदन पुन्हा दिले.
येथील नागरिक मागील सहा ते सात महिने या कामाबाबत नगरपालिका कार्यालयाकडे पाठपुरावा करीत आहेत, परंतु नगरपालिका मुद्दाम पणे टाळाटाळ करत असल्याचा आरोप पतीत पावन संघटनेने केला आहे. कोरोना महामारी मुळे आधीच सर्व जण त्रस्त आहेत त्यात नागरिकांच्या घरांमध्ये तुंबलेल्या गटारीचे पाणी जात असल्याने त्या ठिकाणी होणाऱ्या आजाराच्या प्रादुर्भावास कोण जबाबदार राहणार असा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे, व यातून लवकर मार्ग काढण्याची विनंती केली आहे. निवेदन देते वेळी मा. नगराध्यक्ष योगेश कटारिया, रोहित पाटील, माणिक सोनवणे आदि उपस्थित होते.
शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात रस्त्याच्या अपुऱ्या कामामुळे येथील मुख्य रस्त्यावरच खड्डा झाल्याने रोजच्या होणाऱ्या पावसाचे पाणी या खड्ड्यामध्ये साचत आहे, येथून लोकांचे चालणे मुश्किल झाले आहे, पाण्याने भरलेल्या खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने अनेकदा दुचाकीचे अपघातही या ठिकाणी होत आहे. ही बाबही नगरपालिकेला कळविण्यात आली आहे मात्र या बाबतही नगरपालिका दुर्लक्षच करीत आहे. त्यामुळे आता तक्रार तरी कोणाकडे करावयाची असा प्रश्न सर्व सामान्यांना पडला आहे.

# दौंड राष्ट्रवादी मधील मुस्लिम समाजाच्या पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

दौंड : दौंड शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात सन्मानाची वागणूक मिळत नसल्याने पक्षातील मुस्लिम पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे.
राष्ट्रवादी दौंड शहर अल्पसंख्यांक युवक अध्यक्ष चांद बादशहा शेख, उपाध्यक्ष नासिर शेख, शहर सरचिटणीस इरफान शेख तसेच भारतीय जनता पार्टी शहर सरचिटणीस शाकीर शेख यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे. शिवसेना मध्यवर्ती कार्यालय( चौफुला, दौंड) येथे शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख महेश पासलकर व दौंड शहर प्रमुख आनंद पळसे यांच्या प्रमुख उपस्थित यांनी शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश केला.



उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना महेश पासलकर म्हणाले, शिवसेना हा सामाजिक बांधिलकी जपणारा पक्ष असून तालुक्यात पक्ष करत असलेल्या सामाजिक उपक्रमांनी प्रेरित होऊन शिवसेनेमध्ये मोठ्या प्रमाणावर इन कमिंग सुरू आहे, येथील युवकां साठी शिवसेना पक्ष आकर्षण बनला आहे. पक्ष कोणत्याही जाती, धर्माचे बंधन न मानता तालुक्यातील सामान्य नागरिकांसाठी सर्व समावेशक हिताचे राजकारण करीत असल्याने शिवसेनेमध्ये मोठ्या प्रमाणावर आणखीनही प्रवेश होणार आहेत. यावेळी पक्षाचे तालुका अध्यक्ष देविदास दिवेकर, अजय कटारे, इब्राहिम तांबोळी, नवनाथ जगताप, हनुमंत निगडे, अजित फुटाणे,माऊली आहेर, शंकर शितोळे, प्रशांत जगताप आदि उपस्थित होते.

# दौंड शहरामध्ये इंधन दरवाढी विरोधात कॉंग्रेसचे आंदोलन, केंद्र सरकारचा नोंदविला निषेध

**दौंड :** दौंड शहर कॉंग्रेस कमिटी व दौंड तालुका युवक कॉंग्रेसच्या वतीने देशातील इंधन दरवाढी विरोधात आंदोलन करण्यात आले. शहरातील पेट्रोल पंपावरील आंदोलना दरम्यान आंदोलन कर्त्यांनी केंद्र सरकार व नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणा दिल्या, पंपावर इंधन भरावयास आलेल्या ग्राहकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलनामध्ये सहभाग घेऊन इंधन दरवाढ रोखू न शकणाऱ्या केंद्र सरकारचा निषेध केला. आंदोलनावेळी पक्षाचे शहराध्यक्ष हरेश ओझा, उपाध्यक्ष महेश जगदाळे, युवक तालुका अध्यक्ष अतुल जगदाळे, तन्मय पवार,जॉनी शेख, विठ्ठल शिपलकर, अतिश जगताप आदि उपस्थित होते.



# कामगार उपायुक्त कार्यालयाच्या जनजागृतीपर चित्ररथाचा जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

**पुणे:** राज्यातून बालकामगार प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने समाजाच्या विविध घटकांमध्ये या प्रथेविषयी जनजागृती करण्यासाठी कामगार उपायुक्त कार्यालयामार्फ़त जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. जागतिक बालमजुरी विरोधी दिनानिमित्त कामगार उपायुक्त कार्यालयाच्या जनजागृतीपर चित्ररथाचा जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.यावेळी पुणे विभागाचे कामगार आयुक्त शैलेश पोळ, कामगार उपायुक्त अभय गिते, सहायक कामगार आयुक्त निखील वाळके, मु.अ.मुजावर, विशाल घोडके, सरकारी



कामगार अधिकारी दत्तात्रय पवार, श्रीमती अत्तार उपस्थितीत होते.जागतिक बालमजुरी विरोधी दिनानिमित्त जनजागृतीपर चित्ररथ पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात फ़िरवून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच विविध आस्थापना मालक, औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी, हॉटेल असोसिएशनचे प्रतिनिधी, मराठा चेंबर ऑफ़ कॉमर्सचे प्रतिनिधी, कामगार प्रतिनिधी यांची झूम मिटींग आयोजित करून बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधि. १९८६ यांच्या तरतूदी विषयी माहिती देण्यात आली. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर बालकामगार प्रथेविरूद्ध जास्तीत जास्त डिजिटल माध्यमातून प्रसार व जनजागृती करण्यावर भर देण्यात येत असल्याचे कामगार आयुक्त शैलेश पोळ यांनी सांगितले.

# बांधकाम कामगार यांच्या आरोग्य व सुरक्षा विषयक तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी करावी- अपर कामगार आयुक्त शैलेंद्र ब. पोळ

पुणे : अपर कामगार आयुक्त शैलेंद्र ब. पोळ यांनी पुणे विभागातील बांधकाम व्यावसायिकांना आवाहन केले इमारत व इतर बांधकाम कामगार ( रोजगार व नियमन व सेवाशती) अधिनियम, १९९६ अंतर्गत आपले आस्थापनेत कार्यरत बांधकाम कामगार यांच्या आरोग्य व सुरक्षा विषयक तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी करावी. दरवर्षी मुसळधार पावसाने व वादळी वाऱ्याने बांधकाम आस्थापनेच्या ठिकाणी अपघात होऊन बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबीय मृत्युमुखी पडत असल्याच्या घटनेमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सर्व बांधकाम आस्थापना मालकानी बांधकामाच्या ठिकाणी कोणतीही दुर्घटना किंवा अपघात होणार नाही याची पुरेपुर काळजी घेणे आवश्यक आहे. सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा विषयक सर्व साहित्य / साधने उपलब्ध करून द्यावीत तसेच बांधकाम कामगारांचे व त्याचे कुटूंबीयाची राहण्याची सोय (लेबर कॅम्प) सुरक्षीत ठिकाणी करुन त्यांना आवश्यक त्या सोईसुविधा करुन देण्यात याव्यात. सर्व मोठ्या बांधकाम व्यावसायिकांनी सुरक्षा परिक्षण (सेप्टी ऑडीट) पूर्ण करुन घ्यावे. सेप्टी ऑफीसर नेमावा व त्यास विशेष सतर्क रहाण्याच्या सुचना घ्यावात. प्रत्येक बांधकाम व्यावसायिकाने (ज्यांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कामगार / कर्मचारी एकुण १० पेक्षा जास्त असतील अशांनी) उक्त अधिनियमाअंतर्गत मालक म्हणून नोंदीत होणे कायद्याने बंधनकारक आहे. अद्यापी नोंदणी केली नसल्यास ऑनलाईन (lms.mahaonline.gov.in) या संकेतस्थळावर नोंदणी करावी. बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या सर्व बांधकाम कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात ऑनलाईन पध्दतीने mahabocw.in या संकेत स्थळावर करुन घ्यावी.. नोंदीत बांधकाम कामगारांनाच कामावर नेमावे. अनोंदीत कामगार असल्यास प्राधान्याने त्यांची नोंदणी करुन खातरजमा व्यक्तीशः करावी. मंडळामार्फत बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातात त्या सर्व योजनांचे सर्व लाभ बांधकाम कामगारांना मिळण्याच्या दृष्टीने त्यांना सहकार्य करावे काही अडचण आल्यास या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खडकी येथे सराईत गुन्हेगाराकडून दोन तलवारी जप्त

**दौंड :** खडकी ता.दौंड येथे एका सराईत गुन्हेगाराकडून २ तलवारी जप्त केल्याची माहिती पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पद्माकर घनवट यांनी दिली. दिनांक ११ जुन २०२१ रोजी पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दौंड पोलीस स्टेशन हद्दीत फरारी पाहिजे आरोपीचा शोध घेत असताना पथकास खडकी ता.दौंड जि.पुणे येथे पुणे-सोलापूर लगत संकेत स्वीट समोर एक इसम दोन तलवारी घेवून उभा आहे. अशी बातमी मिळालेने पथकाने खडकी ता.दौंड जि.पुणे येथे पुणे-सोलापूर लगत संकेत स्वीट समोर जावून पाहिले असता तेथे संशयास्पदरित्या मिळून



आलेला इसम दत्ता उर्फ महाराज सोनबा मरगळे (वय २० वर्षेरा.मलठण, चिलोबा वस्ती, ता.दौंड जि.पुणे) यास ताब्यात घेवून झडती घेतली असता त्याचेकडे बेकायदा विनापरवाना बाळगलेल्या २ तलवारी व १ मोबाइल असा एकुण किं.रु. १४,०००/- चा मुद्देमाल जप्त केलेला आहे. आरोपीविरुद्ध दौंड पोलीस स्टेशनला भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. जप्त मुद्देमाल व आरोपी यास दौंड पोलीस स्टेशनचे ताब्यात दिलेला आहे. आरोपीने सदर तलवारी कशासाठी आणल्या आहेत? याबाबतचा अधिक तपास दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार हे करीत आहेत.सदर आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी भोसरी पोलीस स्टेशन (पिंपरी चिंचवड) येथे पिस्तोल बाळगले बाबत आर्म क्ट प्रमाणे गुन्हा दाखल आहे.सदरची कामगिरी ही मा.पोलीस अधीक्षक डॉ.अभिनव देशमुख सो., बारामती विभाग अपर पोलिस अधीक्षक श्री.मिलींद मोहिते सो. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.पद्माकर घनवट सहा.पोलीस निरीक्षक सचिन काळे, महेश गायकवाड, निलेश कदम, सचिन गायकवाड, सुभाष राऊत, गुरु गायकवाड, अभिजित एकशिंगे यांनी केलेली आहे.

# पुणे पोलिसांच्या 'माय पुणे सेफ' पसह बदली सॉफ्टवेअरचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे:** उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या 'माय पुणे सेफ' ॲप व बदली सॉफ्टवेअरचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सह पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त डॉ. जालिंदर सुपेकर, पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, स्वप्ना गोरे, मितेश घट्टे, प्रियांका नारनवरे, सहायक पोलीस आयुक्त सतिश गोवेकर यांसह पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते .माय पुणे सेफ पची कार्यपध्दती पुणे शहरातील नागरिकांसाठी तसेच कोणत्याही घडलेल्या घटनेच्या ठिकाणी पोलीसांची तात्काळ सेवा उपलब्ध होण्यासाठी पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे संकल्पनेतुन पुणे शहर आयुक्तालयातील पोलीस स्टेशन कडील बिट मार्शल यांचे दैनिक गस्तीसाठी माय सेफ पुणे ॲप



तयार करण्यात आले आहे. या पच्या सहाय्याने पोलीस स्टेशन कडील बिट मार्शल हे हद्दीमध्ये पेट्रोलिंग दरम्यान एखाद्या घडणाऱ्या गुन्हयास प्रतिबंध होण्याकरीता महत्वाचे ठिकाणी भेटी देवून किंवा कोणत्याही घडलेल्या घटनेच्या ठिकाणी भेट देवून त्या ठिकाणी सेल्फी फोटो काढुन माय सेफ पुणे ॲपमध्ये अपलोड केल्यास घटनेच्या ठिकाणाचे अक्षांश आणि रेखांश व वेळ नोंद होते. पवरुन पोलीस नियंत्रण कक्ष पुणे शहर यांना सदरचे बिट मार्शल कोणत्या भागामध्ये गस्तीवर आहे याची माहिती मिळते. बिट मार्शलने कोणत्या वेळी कोणत्या ठिकाणी भेट दिली याची सर्व माहिती कायमस्वरुपी प मध्ये उपलब्ध राहते. हे ॲप परिमंडळ चारचे पोलीस उप आयुक्त पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ कार्यक्षेत्रामध्ये यशस्वीरित्या राबविण्यात आले आहे. बदली सॉफ्टवेअरबद्दल माहिती बदली सॉफ्टवेअरच्या मदतीने पुणे शहर पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासकीयदृष्ट्या परंतु पारदर्शकपणे मनासारखी बदली मिळण्यास मदत होणार आहे. या पमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम, त्यांचा कार्यकाळ इत्यादीबाबीची नोंद असणार आहे. पोलीस स्थानकामध्ये समान पोलीस कर्मचाऱ्याचे बदलीने वाटप करण्यास मदत होणार आहे. यावेळी या सॉफ्टवेटरचे पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी सादरीकरण करुन कार्यपध्दतीबाबतची माहिती दिली.

# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जासाठी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत आता ८ लाख रुपयांपर्यंत वाढ

मुंबई : मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्ज योजनेकरिता आता विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती अल्पसंख्याक विकासमंत्री नवाब मलिक यांनी दिली. आतापर्यंत ही उत्पन्न मर्यादा वार्षिक अडीच लाख रुपये इतकी होती. आता उत्पन्न मर्यादा वाढविल्याने जास्तीत जास्त अल्पसंख्याक विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतील, असे श्री. मलिक यांनी सांगितले.मंत्री श्री. मलिक म्हणाले, राज्य शासनाकडून मिळालेल्या भागभांडवलाच्या निधीतून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी, जैन आणि ज्यू समाजातील विद्यार्थ्यांसाठी ही शैक्षणिक कर्ज योजना राबविली जाते. १८ ते



३२ वयोगटातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना व्यावसायिक तसेच उच्च शिक्षणासाठी अडीच लाख रुपये मर्यादेपर्यंत शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. ३३ टक्के इतक्या व्याजदराने हे कर्ज दिले जाते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील सहा महिन्यानंतर ५ वर्षेकालावधीमध्ये विद्यार्थ्याने या कर्जाची परतफेड करावयाची असते. या योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी महामंडळाच्या जिल्हास्तरीय कार्यालयाशी किंवा जुने जकातगृह, फोर्ट, मुंबई येथील कार्यालयाशी संपर्क साधावा. महामंडळाच्या www.mamfdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट> Úmdr qH$dm https://malms.maharashtra.gov.in या लिंकवर क्लिक करावे. पुढील शैक्षणिक वर्षात जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.याशिवाय, केंद्र शासनाच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजनेतून ५ लाख रुपयांपर्यंत शैक्षणिक कर्ज देण्यात येते. या योजनेतून लाभासाठी शहरी भागाकरिता विद्यार्थ्याची कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाख २० हजार रुपये तर ग्रामीण भागाकरिता कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ९८ हजार रुपये इतकी आहे. यासाठीही विद्यार्थी अर्ज करु शकतात, असे मंत्री श्री. मलिक यांनी सांगितले.

सहकारनामा हे साप्ताहिक मुद्रक,प्रकाशक,मालक - अब्बास इसाक शेख यांनी प्रिती प्रिंटींग प्रेस,हरिकृपानगर,मार्केट यार्ड जवळ,इंदापूर रोड बारामती, जि.पुणे (महाराष्ट्र) येथे छापून केडगाव,मस्जिद जवळ,ता.दौंड जि.पुणे पिन.४१२२०३(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक- अब्बास इसाक शेख
This Newspaper weekly Sahkarnama Printer Published & Owner by Abbas Isak Shaikh And Printed by Priti Printing Prees,Harikrupa Nagar,Market Yard Baramati,Dist-pune 413102 and Published by At/Post.Kedgaon,Near Masjid,Tal-Daund,Dist-Pune 412203.Maharashtra Editor Abbas Isak Shaikh Mo:9096777750